# एल.ए.आर.क्र. ३२१/२०२१
# CNRNoMHOS120003352021
# सुर्यभान वि. महाराष्ट्र शासन
# नि.क्र. १० खालील आदेश
# (आदेश दि.१६/०३/२०२२)

०१. नि.क्र. १० वरील अर्ज अबेटमेंटचा झालेला आदेश रद्द होणेबाबत दाखल केलेला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुत अर्जातील अर्जदार सुर्यभान उर्फ सुरेश श्रीपती काळे हे दि.०९/०९/२००८ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदाराने मयत अर्जदार सुर्यभान उर्फ सुरेश श्रीपती काळे यांचे वारस हे वेळेत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. परंतु, अर्जदार हे कामानिमीत्त मुंबई येथे राहत असल्यामुळे व कोवीड–१९ च्या लॉकडाऊनमुळै गांवी मौज पाडोळी, ता. भूम येथे येजा करता आले नाही त्यामुळे अर्जदारास प्रस्तुत प्रकरणाची माहिती होऊ शकली नाही. त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला असल्यामुळे अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. त्यामुळे प्रकरणात अबेटमेंटचा झालेला आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती त्यांनी अर्जाद्वारे केलेली आहे.

०२. मी सदर अर्जावर युक्तीवाद ऐकलेला आहे.

०४. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार सुर्यभान उर्फ सुरेश श्रीपती काळे हे दि.०९/०९/२००८ रोजी मयत झालेले आहेत, तर अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज दि.२३/०२/२०२२ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. सदरचे प्रकरण हे संपादीत जमिनीचा मावेजा वाटपाबाबतचा आहे. त्यामुळे मयत अर्जदार सुर्यभान उर्फ सुरेश श्रीपती काळे यांचे वारसांचे हक्क व हितसंबंध अर्जात समाविष्ट असल्यामुळे झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. परिणामतः खालील आदेश.

## आदेश

०१. नि. क्र. १० खालील अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by VARSHA BALVANTRAO PATIL
Date: 2022.03.16 03:40:18 +0530

दिनांक – १६/०३/२०२२

(सौ.व्ही. बी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. V. B. Patil,<br>Jt. Civil Judge, Senior Division,<br>Bhoom, District-Osmanabad. |
| Date | --- | 16/03/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 16/03/2022 |
| Order uploaded on | --- | 16/03/2022 |